# चंद्रगुप्त

हरि नारायण आपटे

समन्वय प्रकाशन, कोल्हापूर

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**चंद्रगुप्त : हरि नारायण आपटे**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, उद्यमनगर, कोल्हापूर.

**आवृत्ती**
डिसेंबर, २०१२

**किंमत**
रुपये ३००/-

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| | उपोद्घात–पूर्वार्ध–वत्सलाभ | ५ |
| | उपोद्घात–उत्तरार्ध–दरिद्री ब्राह्मण | १२ |
| १. | प्रयाण | २४ |
| २. | पाटलिपुत्र | ३१ |
| ३. | मुरादेवी | ३७ |
| ४. | बुद्धभिक्षु | ४३ |
| ५. | चाणक्याचा विचार | ५२ |
| ६. | आरंभ | ६० |
| ७. | पहिले पाऊल | ६८ |
| ८. | दुसरे पाऊल | ७५ |
| ९. | पत्रवाचन | ८२ |
| १०. | काय भाषण झाले? | ८९ |
| ११. | चाणक्याचे कारस्थान | ९४ |
| १२. | चाणक्याचा स्वत:शी विचार | १०३ |
| १३. | सुवर्णकरंडकांतील अपूप | ११० |
| १४. | मार्जारीचा मृत्यु | ११८ |
| १५. | चाणक्याच्या उलाढाली | १२४ |
| १६. | भागुरायण सेनापति | १३१ |
| १७. | अमात्य राक्षस | १३८ |
| १८. | अपराधी कोण? | १४६ |
| १९. | उपक्रम | १५४ |
| २०. | अमात्याच्या गांवींहि नाही? | १६२ |
| २१. | अमात्याने काय केले? | १६७ |
| २२. | मुरादेवीचें कारस्थान | १७३ |
| २३. | मनाची चंचलता | १८१ |
| २४. | निश्चय डळमळला! | १८८ |
| २५. | भाचा की मुलगा? | १९५ |
| २६. | पति की पुत्र? | २०१ |
| २७. | स्वत:चा स्वाहाकार | २०८ |
| २८. | पर्वतेश्वरास पकडले | २१५ |
| २९. | राक्षस चकित होतो | २२१ |
| ३०. | चंद्रगुप्ताची स्वारी | २२८ |
| ३१. | राक्षसाची प्रतिज्ञा | २३३ |
| ३२. | न्याय काय झाला? | २४० |
| ३३. | न्यायाधीश की अपराधी? | २४६ |
| ३४. | आणखी एक शक्कल | २५३ |
| ३५. | प्रतिज्ञाभंग की मित्रवध? | २६० |
| ३६. | राक्षसाचा निश्चय | २६६ |
| ३७. | चाणक्याचा विचार | २७२ |
| ३८. | संवाहक | २७९ |
| ३९. | राक्षस आणि शाकलायन | २८७ |
| ४०. | चाणक्याने हात टेकले! | २९५ |
| ४१. | राक्षस व चाणक्य | ३०२ |
| ४२. | उपसंहार | ३११ |

### उपोद्घात–पूर्वार्ध

# वत्सलाभ

हिमालय पर्वत म्हणजे सर्व पृथ्वीवरील पर्वतांचा राजा अशी सार्वत्रिक समजूत आहे; आणि शिखरांच्या उंचीमुळे, त्यावरील वनस्पतींच्या अनंततत्वामुळे, भव्य वनशोभेमुळे महानद व महानद्या यांच्या उगमांमुळे, विस्तृतशा दऱ्याखोऱ्यांमुळे, तेथे असणाऱ्या हिंस्र श्वापदांमुळे आणि वृक्षांच्या गगनचुंबी विशालत्वामुळे या गिरिश्रेष्ठास ती पदवी पूर्णपणे शोभतेहि. यावरील वने अत्यंत गहन आणि फार भयंकर; ती नेहमी अत्यंत शीत असल्याकारणाने येथील हिंस्र व इतर जनावरेहि स्वभावसिद्ध ऊर्णावस्त्रांनी आच्छादित; आणि जे मानवी प्राणी यावर राहतात ते आपल्या शरीराच्या रक्षणाकरितां या पशूंस मारून त्यांच्या नैसर्गिक वस्त्रांचाच आपल्या शीतनिवारणार्थ उपयोग करतात.

भयंकर पर्वत असो, की अगदी रखरखीत असे वालुकारण्य असो, मनुष्यप्राण्यानें आपल्या राहण्याची सोय तेथे केली नाही असे कधी झालेच नाही. जेथे म्हणून आपला जीव अनायासानें तगवतां येईल, तेथे हा प्राणी जाऊन तेथील झाडाझुडपांचा व इतर प्राण्यांचा फन्ना पाडून आपली राहण्याची तजवीज करून टाकावयाचाच. याच न्यायाने या पर्वताच्याहि भागांवर जेथे जेथे म्हणून जाऊन राहणे शक्य, तेथे तेथे येथील रानटी खासिआ इत्यादि लोक आहेतच. अमुक ठिकाणी म्हणजे मनुष्य राहणे शक्य असून तेथे मनुष्य नाही असे कोठेच स्थान सापडावयाचे नाही. यापैकी काश्मीरच्या लगत्याला जे या पर्वताचे भाग आहेत, यांवरील व पूर्वेच्या सर्व पठारांवरून फार प्राचीन काळी धनगरांचा व गवळ्यांचा धंदा करणारे लोक फार असत. त्यांनी आपली मेंढरे व खिल्लारें आपल्या राहण्याच्या खोऱ्यांतून रोज पर्वतावर चरणीसाठी हांकून न्यावी. तेथे एखाद्या पठारावर गेले म्हणजे गुरांस मोकळे हिंडू द्यावे आणि आपण आपले वेणुवाद्य काढून वाजवीत बसावे, किंवा वनपुष्पें सांपडतील त्यांच्या माळा करून आपल्या स्वत:च्या, आपल्या मातापितरांच्या अथवा तरुण मित्रमंडळींच्या व आपल्या गुरांमेंढरांच्या

गळ्यांत घालाव्या. मध्यान्हीच्या सुमारास भाकर-तुकडा खाण्याची वेळ झाली की, आपली शिदोरी सोडावी व ती सर्व मित्रमंडळींनी एकत्र बसून मौजेने खावी, असा क्रम चाले.

मगध देश आणि गंगातटाक यांच्या सीमेपासून किंचित् उत्तरेच्या बाजूस असणाऱ्या एका खोऱ्यांतील गुराखी वरच्या एका पठारावर गेले होते. दिवस ग्रीष्म ऋतूचे होते. भगवान् सूर्यनारायण या दिवसांत जरा सगळीकडेच अधिक काळपर्यंत आपल्या प्रकाशाचा लाभ देत असतो. त्यांतून पर्वतशिखरावर व सपाटीपेक्षा किती वेळ तरी त्याच्या सायंकाळच्या किरणांनी भिन्नभिन्न स्थानी रंगांनी आकाश रंजित केलेले दिसते. सदोदित थंडी असली तरी या दिवसांत ती थंडी त्रासदायक वाटत नाही. थोडेसे त्या थंडीपासून तेथील लोकांस सुखच होते. अशा ऋतूंत एके दिवशी सायंकाळी वर सांगितलेल्या प्रांताच्या उत्तर भागी असलेल्या हिमाचलाच्या वरील पठारावरून गुरे, मेंढरे व त्यांचे पाळक उतरून खाली खोऱ्यांत येत होते. खाली खोऱ्यांत उतरण्याबरोबर त्यांची त्यांची गुरेमेंढरे ज्याच्या त्याच्या खोपीकडे गेली. एक कळप एका खोपीच्या बाजूस गेला. त्या खोपीजवळ एक वृद्ध गुराखी उभा होता. तो मोठ्या प्रेमाने आपल्या त्या कळपाचे स्वागत करण्यासाठी पुढे झाला. सर्व गुरे त्याच्या जवळून गेली. ती त्याला पाहून जणू काय आनंदल्याप्रमाणे झाली. तोहि त्यांजकडे फार प्रेमाने पाहून हसत होता. पाहतां पाहतां त्याच्या दृष्टीखालून सर्व गुरे गेली. ती ज्या आवारांत बांधली जात तेथे बांधली गेली-बांधली गेली म्हणण्यापेक्षा कोंडली गेली असे म्हटले तर विशेष शोभेल. सर्व गुराख्यांची व इतर लोकांची गुरे इत्यादि बांधल्यावर तो गुराखी आत जाणार, तो दुसरा एक त्याच्याच वयाचा वृद्ध माणूस त्याचेजवळ आला, आणि ते दोघे एकमेकांशी बोलत बसले. इतक्यात तिसरा एक तसाच वृद्ध गृहस्थ आला. चवथा आला. असे होतां होतां त्याच्या खोपीपुढे आठदहा म्हातारी मंडळी जमली. या वेळी सूर्यास्त होऊन पुन: थंडी चांगली चमकूं लागली होती. त्यांत पौर्णिमेची रात्र होती. त्यामुळे सुंदर चांदणे पडले होते. ती सर्व म्हातारी माणसे-त्यांनी तितक्यांत एक शेकोटी केली, आणि त्या शेकोटीच्या सभोवार सर्व मंडळी बसली. म्हातारी मंडळी एकत्र जमल्यावर काय चालावयाचे? आपल्या तरुणपणाच्या ऐन उमेदीतल्या काहीतरी गोष्टी चालावयाच्या; परंतु आज तसल्या गोष्टी निघाल्या नाहीत. मौर्यांचा राजा गृहपति हा यवनांच्या त्रासाने त्यांच्याशी लढत असतां रणांगणी पडला. आणि त्याची पत्नी मगध देशाकडे पळून जातांना आपण पाहिली असे एका वृद्ध मनुष्याने मंडळींस

सांगितले. तेव्हा सर्वांस अतोनात दु:ख होऊन यवनांच्या गोष्टी निघाल्या. यवनांनी पंचजनांवर हल्ला करून तेथे फार कहर गुदरविला आहे. पौरस (पवतश) राजाचा पूर्ण पराभव करून त्याचे राज्य पादाक्रांत करून गंगातटाकापर्यंतचा सर्व प्रदेश जिंकून टाकण्याचा त्यांचा घनघोर प्रयत्न चालला आहे, अशीहि गोष्ट त्यांत निघाली. ज्या गुराख्याच्या खोपीपुढे हा जमाव जमला होता, त्याचे मन त्या सर्व बातम्या ऐकून अतिशय उद्विग्न व संतप्त झाले, आणि एकदम इतरांस उद्देशून तो गुराखी म्हणतो, ''जो काळ गेला तो फार उत्कृष्ट गेला. आतां दिवसानुदिवस आपल्यासारख्यांनी जगण्यांत मौज नाही. हा आपला देश कधीतरी यवनांच्या तडाक्यांत सापडेल असे भविष्य जर कोणी यापूर्वी केले असते तर मी त्याला उभें चिरून टाकले असते. पण आज तोच प्रसंग प्रत्यक्ष घडला असून आपण त्याच्याविषयी नुसत्या गोष्टी सांगत बसलो आहो. पर्वतेशाच्या अवाढव्य राज्याची धूळधाण व्हावी, आणि ती आमच्या हयातीत! त्यापेक्षा आम्हांला मृत्यु आलेला काय वाईट?''

म्हातारा हे बोलत असतां त्याचे सर्वांग थरथर कांपत होते. प्रत्येक शब्द बाहेर येत होता तो जणू काय त्याचे अंत:करण पिळवटून, किंबहुना ते भेदून, बाहेर पडत होता, असे स्पष्ट दिसले.

त्याच्या त्या बोलण्याचा काही परिणाम इतरांच्या मनावरहि झाला. वस्तुत: पाहता ते सर्व गुराखी पेक्षाचेच लोक होते. त्यांस कोण राजा कोठे आला व कोण कोठे गेला त्याची माहिती असण्याचा संभव अगदी कमी; आणि हिमालयाच्या अगदी पूर्वभागी जर ते असते तर त्यांस इकडे पश्चिम देशांत काय चालले आहे हे कधीहि समजतेना. परंतु शिकंदराने आक्रांत केलेल्या पंजाब व मगध देशाची पश्चिमेकडील मर्यादा, यांच्या दरम्यान असणाऱ्या उत्तर भागाच्या खोऱ्यांत राहणाऱ्या या गरीब लोकांस ह्या महत्त्वाकांक्षी यवनांपासून त्रास होऊ लागला होता. शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आल्यापासून परत सीमेच्या बाहेर जाईपर्यंत वीसच महिने होता. परंतु पंजाबच्या राजाचा पूर्ण पराभव केल्यामुळे त्याची भूतृष्णा अधिक तीक्ष्ण होऊन, गंगेचे तटाक ओलांडून खुद्द मगध देश जिंकावा अशी महत्त्वाकांक्षा त्याने धरिली. या महत्त्वाकांक्षेमुळेच वर सांगितलेल्या मध्य प्रांतांतील लोकांस त्यांच्या स्वाऱ्यांनी फार त्रास होत असे. त्यांनी स्वाऱ्या करून गुरे मारून न्यावी, किंवा क्वचित् क्वचित् स्त्रियाहि पळवून न्याव्या, असा त्यांचा दुष्ट क्रम चालला होता. अगदी पायथ्याशी जे लोक राहात ते तर त्यांच्या या लुटारू स्वाऱ्यांना इतके कंटाळले होते की, आपापल्या

खोपी व गुरांची आवारें उठवून, हिमालयाच्या अंतर्भागात, गहन अशा अरण्यात जाऊन राहणे त्यांस बरे वाटले. श्वापदांनी चार गुरेमेंढरे खाल्ली तरी ती पत्करली, परंतु या दुष्टांचा त्रास नको, हा ज्याचा त्याचा विचार; असा एकंदर त्या गरीब लोकांचा अनुभव असल्यामुळे, यवनांचे नाव निघाले की, त्यांच्या अंगाचा संताप व्हावा हे अगदी साहजिक होय. आणि एकंदर हकीकत वाचली म्हणजे वर सांगितलेल्या त्या गुराख्यांच्या उद्गारांचे वाचकांस आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. गोष्टीवरून गोष्टी निघतां निघतां प्रत्येकाने ग्रीक लोकांनी म्हणजे यवनांनी मांडलेल्या उच्छादाच्या कर्णोपकर्णी ऐकिलेल्या किंवा प्रत्यक्ष अनुभविलेल्या गोष्टी सांगितल्या. ग्रीक लोकांत गावालंभाची–बैलाचा यज्ञ करण्याची–स्थंडिलांवर बळी देण्याची चाल असे, आणि ग्रीक लोकांचा जय झाला त्या वेळी त्यांनी आनंदोत्सवार्थ या गरीबगुरीब लोकांचे चांगले धष्टपुष्ट बैल धरून आणून कित्येक वेळी तरी त्यांचे यज्ञ केले. या सर्व त्रासाबद्दल त्या लोकांस अतिशय वाईट वाटत होते व यांचे कोणी शासन करणारा पुरुष जन्मास येत नाही का, असे वारंवार म्हणून ते जणूं काय परमेश्वराचा धावा करीत असत. परंतु तो धावा परमेश्वर कधी ऐकेल असे वाटण्यास त्यांस अजून तरी काही कारण दिसत नव्हते.

वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या गोष्टी चालल्या असतां आमच्या म्हाताऱ्या गुराख्याची एक कन्या धावत धावत येऊन आपल्या बापास म्हणाली, ''बाबा, त्या आपल्या कपिलेला नव्या झालेल्या वासराचा पत्ता लागत नाही. आजच ते पहिल्याप्रथम तिच्या पाठोपाठ गेले होते; आता दूध काढण्याच्या वेळी त्याला शोधू लागले तो ते कुठेही दिसेना. ते कितीतरी सुलक्षण आणि गोजिरवाणे होते!''

हे तिचे शेवटचे शब्द अतिशय सद्गदित अशा कंठाने उच्चारलेले होते आणि तिचे डोळेहि अश्रुपूर्ण दिसले. त्यांचे खिल्लार लहानसहान होते असे नाही; ते फार मोठे होते. परंतु त्यातील एकहि वासरूं किंवा मेंढरूं नाहीसे झाले असे समजताक्षणी त्याची मोठी त्रेधा उडत असे. त्यांत ज्या विवक्षित गाईचे वासरूं आज नाहीसे झाले होते, त्या गाईवर व त्या वासरांवर त्यांचे अतिशय प्रेम असे. त्या काळी मोठमोठी खिल्लारे म्हणजेच मोठे थोरले धन असे त्यातहि पशुसामुद्रिकाप्रमाणें सर्वसुलक्षणसंपन्न असे एखादे वासरूं किंवा गाय ज्याच्याजवळ असेल तो मोठा भाग्यशाली समजला जात असे. जे वांसरूं आता हरवले होते ते असेच सुलक्षणी असल्याकारणानें ते कोठेंतरी गेले असे ऐकण्याबरोबर त्या गुराख्याचे मन एकदम उद्विग्न होऊन तो त्या मंडळींतून

उठला. ग्रीक यवन लोक गरीबगुरिबांची गुरेवांसरे कशी चोरतात याविषयी भाषण चालले असतां आपले एक वासरूं नाहीसे झाल्याबद्दलची बातमी यावी, हे त्या गुराख्यास मोठे दुश्चिन्ह वाटलें आणि त्याच्या मनाने असे पक्के घेतले की, आज गुरे चारणीस जात असतांना हे वासरूं मागे राहून कोणातरी यवनाने लांबविले असावे. लागलीच त्याने या वासरांबद्दल शोध चालविला. आपले खिल्लार कोठपर्यंत गेले होते, गुरेराख्या पोरांची दृष्टि त्या वांसरावर कोठपर्यंत होती, त्याला आणखी कोणी कोणी कोठपर्यंत पाहिले होते, शेवटी कोणी कोठे पाहिले होते, अशी नाना प्रकारांनी त्याने चौकशी केली, तो त्यास असे कळले की, पठारावर जाईपर्यंत वासरूं खास होते. पठारावरून गुरे खाली आणली तेव्हांपासून मात्र त्यास पाहिल्याचे कोणी सांगेना. तेव्हा अर्थातच वासरू वरच कोठेतरी अडकून बसले असावे किंवा एखाद्या वाघराबिघराने त्याला धरले असावे असा सर्वांचा तर्क झाला. परंतु असा नुसता तर्क करून निराश होऊन बसणारांपैकी तो म्हातारा गुराखी नव्हता. त्या वासरांचा पक्का पत्ता लागेपर्यंत मी अन्न घेणार नाही असे तोंडाने म्हणून, त्याने लागलीच वर जाण्यासाठी कंबर बांधली. आपला तिरकमठा बरोबर घेतला आणि आपल्याबरोबर जे कोणी वर जाण्यास तयार असतील त्यांनी चलावे, असे म्हणून तो पर्वत चढू लागला.

वर सांगितलेंच आहे की, ती रात्र पौर्णिमेची होती. ग्रीष्म ऋतु असल्याकारणानें आकाश अगदी निरभ्र होते. चंद्रापासून द्रवणाऱ्या तेजोरसाने व्याप्त झाल्याप्रमाणे सर्व आकाश दिसत होते. दूरवरची हिमालयाची अत्युच्च शिखरे आधीच हिमाच्छादित आणि त्यात त्या पौर्णिमेच्या चंद्राची सोज्वल कांति त्यांचेवर पडलेली, त्यामुळे असा भास होत होता की, जणूं काय ती कांति आकाशगंगेच्या ओघाने धो धो वाहात भूलोकी येऊन सर्वत्र पसरत होती. हिमाचलावरील अरण्यें हिंस्र व अन्य पशुपक्ष्यांनी अगदी गजबजलेली. परंतु त्या रात्री सर्व स्थळे व्यापून राहिलेल्या त्या चंद्रकांतीमुळे जणूं काय प्राणिमात्र मोहित होऊन स्तब्ध झाले होते.

ही इतकी दिव्य शोभा दिसत होती खरी, परंतु एका ब्रह्माचे ठायी मात्र चित्ताचा लय लागलेल्या साधूप्रमाणे त्या वृद्ध गोपालाचे चित्त त्याच्या त्या सुलक्षण गोवत्साकडे लागून राहिले होते. त्याचे नेत्र त्या वेळी ते वत्स कोठे दिसेल काय, हे पाहण्यासाठीच होते व त्याचे कर्ण त्या वत्साचा आर्त स्वर कोठून ऐकू येईल काय, हे ऐकण्यासाठीच होते. त्याचेबरोबर आलेल्या इतर मंडळींत काही तरुणही होते; परंतु त्याच्या त्या वत्सशोधनाच्या आतुरतेमुळे याच्या पायांत इतर सर्वांपेक्षा कितीपट तरी शक्ती आली

होती! पठाराच्या जवळ जवळ येण्याबरोबर त्याने निरनिराळ्या माणसांत निरनिराळ्या मार्गाने जाऊन सर्व अरण्यांत त्या वत्साचा शोध करण्यास सांगितले आणि आपण स्वत: एका मार्गाने जाता जाता ज्या काही जाळ्या लागल्या, किंवा लहानसहान गुहा दिसल्या, त्यांच्या त्यांच्या जवळ जाऊन त्याने आपल्याकडून पुष्कळ शोध केला, परंतु व्यर्थ; वासराचा कोठेही पत्ता लागेना. शेवटी निराश होऊन नेहमी ज्या मार्गाने गुरे खाली येत, त्या मार्गाहून दुसरा एक बिकट असा खाली उतरण्याचा मार्ग होता; त्या मार्गास कदाचित् ते वासरूं लागले असेल असे मनात येऊन आपणांस रात्री त्या मार्गाने उतरणे अधिक कठीण जाईल की काय याचा विचार न करता, त्याने एकदम तो मार्ग धरला. अशा मार्गांतून अनेक वेळां जाण्यायेण्यास सरावलेला तो गडी, परंतु हा मार्ग इतका कठीण होता की, त्या मर्गाने खाली उतरून जाण्यास त्यास अनेक वेळा अडचण पडू लागली. होता होता ती वाट जवळजवळ पाऊण हिस्सा सरली. आता फक्त पाव हिस्साच राहिली. परंतु तेथे समोर पूर्वेस मगध देशाकडे जाण्याला तेथून तशाच प्रकारचा एक बिकट फाटा फुटला होता. तेव्हा आपण आपल्या खाली जाण्याच्या वाटेनेच खाली जावें की समोर या मगध देशाकडे जाणाऱ्या वाटेने थोडेसे पुढे जावे याबद्दल तो बुचकळ्यांत पडला. बराच वेळ समतोल कांट्याप्रमाणे एकदा एका बाजूस व एकदा एका बाजूस त्याचे मन कलू लागले. एक नक्की विचार होईना. शेवटी आपल्या खालच्या वाटेस लागावे असा निश्चय करून तो पाऊल टाकणार तों जवळच कोठेतरी अगदी तान्हे मूल रडल्याप्रमाणे आवाज होत आहे असा त्यास भास झाला. परंतु असल्या विलक्षण ठिकाणी एवढ्या रात्री तान्हे मूल कोठून ओरडणार? एखादे चमत्कारिक श्वापद ओरडले असेल अशी मनाची समजूत करून तो पुन: खाली उतरूं लागणार, तों आणखी एकवार आणि अगदी स्पष्टपणे तान्ह्या मुलाचा कंठशोष करून रडण्याचा आवाज त्याचे कानी पडला. हा काय चमत्कार आहे ते जरूर पाहावेच असा निश्चय करून तो त्या मगध देशाच्या वाटेकडे वळला; कारण तो रडण्याचा आवाज त्या बाजूनेच येत होता.

त्या आवाजाच्या धोरणाधोरणाने तो सुमारे पांचसातशे पावले पुढे जातो, तो एका मोठ्या थोरल्या वटवृक्षाच्या छायेखालून ते रडणे निघत आहे असे त्याच्या लक्षात आलें, आणि तो लागलीच त्या वृक्षाखाली जेथून आवाज येत होता तिकडे धावत गेला तो पांढऱ्या स्वच्छ अशा कपड्यांत गुंडाळलेले एक अर्भक पुष्कळशा पाचोळ्यावर ठेविलेले असून चळवळ करते आहे व मोठमोठ्याने रडतेहि आहे असे त्याने पाहिले.

म्हाताऱ्याचे अंत:करण त्या अर्भकाच्या आक्रंदनानें अतोनात कळवळले. लागलीच त्याने त्यास उचलून घेऊन छायेंतून बाहेर चांदण्यांत आणले व त्याच्याकडे एकवार पाहून लागलीच त्याला उगी उगी करीत पोटाशी धरून त्याने मोठ्याने उद्गार काढला, ''शिव शंभो कैलासनाथ, अशा सुंदर अर्भकाला अशा गहन अरण्यांत टाकून जाणारे नरपशु कोण असतील ते असोत, किंवा बिचाऱ्यावर काय प्रसंग आला असेल तोही असो; मी आपल्या गोवत्साचा शोध करीत असतांना, कैलासनाथा, तू हे अर्भक मला दिलेस, यावरून तुझी इच्छाच मला अशी दिसते की, माझ्या हातून त्याचे पालनपोषण व्हावे. मी गरीब खरा, पण मोठ्या प्रेमाने याला वाढवीन.''

काय असेल ते असो, म्हाताऱ्याने पोटाशी धरण्याबरोबर ते दीन बालक एकदम गप्प राहिले व त्या म्हाताऱ्याच्या अंगाशी जास्ती जास्तीच बिलगू लागले. आपल्या गोवत्साचा शोध करण्याकरिता म्हणून परमेश्वराने आपल्यास येथे आणले आणि आपल्या स्वाधीन हे बालक केले यात त्याचा काहीतरी हेतु आहे असे मनांत म्हणत म्हणत त्याने आपल्या खोऱ्याकडील वाट धरली. खोऱ्याजवळ जातो तो त्याचे वासरूही सापडल्याची आनंदवार्ता त्यास समजली. मग काय विचारता? तो ज्यास त्यास असेच म्हणू लागला की, ''भगवान् कैलासनाथाच्या मनांतून मला हे बालक द्यायचे होते, माझ्या हातून त्याचे प्राण वाचायचे होते, म्हणूनच केवळ त्याने माझे वासरू चुकविले.'' ज्याला त्याला त्याने ते बालक दाखविले. ते बालक पाहून सर्वांच्या मनाची अशी खात्री झाली की, हे कोणीतरी थोरामोठ्याचे असावे. परंतु त्या बालकाचे अंगावर खूण पाहिली तर एका रत्नखचित रक्षाबंधनाखेरीज काहीहि नव्हती.

✦✦✦